राज्यातील बंद असलेल्या अनुदानीत विशेष शाळा/कर्मशाळा सक्षम संस्थांना हस्तांतरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. इडीडी-२०१९/प्र.क्र.१६२/अ.क.१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १५ जून, २०१९

वाचा:- १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इडीडी- २०१७/ प्र.क्र.६/अ.क.१ दिनांक १६ सप्टेंबर,२०१७.

प्रस्तावना :-

राज्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा चालविल्या जात आहेत. अशा शाळा/कर्मशाळांना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अन्वये अपंग क्षेत्रात कार्य करण्यासाठी सक्षम अधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. अशा नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांना सामाजिक न्याय विभागामार्फत शासन मान्यता देऊन अनुदान देण्यात येते. राज्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या मान्यता व अनुदान प्राप्त असलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे अथवा संबंधीत संस्था शासन मान्यता व अनुदान प्राप्त असलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा बंद करु इच्छित असते व अन्य काही कारणास्तव बंद पडल्या असतील किंवा भविष्यात बंद पडतील अशा अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा, मूळ संस्थेऐवजी सक्षम व शासनाच्या सर्व अटी आणि शर्ती मान्य असणाऱ्या संस्थांना हस्तांतरीत व आवश्यकतेप्रमाणे स्थलांतरीत करण्यास दि.१५ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून विशेष शाळा/कर्मशाळा हस्तांतरीत करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच याबाबतचा निर्णय घेण्यासाठी शासन स्तरावर मा.मंत्री यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

शासन निर्णय दि. १५.०२.२०१९ मधील तरतूदीनूसार राज्यातील बंद असलेल्या विशेष शाळा/ कर्मशाळा सक्षम संस्थांना हस्तांतरीत करण्याबाबत आयुक्तालयामार्फत जाहिरात देवून जाहिरातीच्या अनुषंगाने स्वयंसेवी संस्थांमार्फत प्राप्त प्रस्तावाचे अवलोकन करुन योग्य संस्थेची निवड करण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची बैठक दि. २५.०२.२०१९ रोजी मा.मंत्री, सा.न्या. यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री महोदयांचे मंत्रालयीन दालन क्र. ३१६ (विस्तार) , तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे दु.०२.०० वाजता संपन्न झाली. राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात सुरु असलेल्या विशेष शाळा/कर्मशाळांची सांख्यिक माहितीनूसार असे निदर्शनास आले की, काही जिल्ह्यांमध्ये बहुसंख्य प्रमाणात विशेष शाळा/कर्मशाळा कार्यान्वित आहे तर काही जिल्ह्यांमध्ये विशेष शाळा/कर्मशाळांचे प्रमाण अत्यल्प आहे तसेच राज्यातील काही तालुक्यांमध्ये अनुदान तत्वावरील विशेष शाळा/कर्मशाळा

उपलब्धच नाही. यामुळे दिव्यांग बालकांना नजिकच्या ठिकाणी विशेष शिक्षणाची सुविधा उपलब्ध होत नाही. राज्यातील विशेष शाळा/कर्मशाळा बाबत असलेली विषमता दूर करण्याकरीता व दिव्यांग बालकाची शैक्षणिक गैरसोय टाळण्याकरीता शिक्षण हक्क अधिनियम २००९, दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ तसेच राज्यस्तरीय समिती हस्तांतरण-स्थलांतरण धोरणातील तरतुदीस अनुसरुन राज्यस्तरीय समितीने योग्य स्वयंसेवी संस्थांची निवड केली. त्यानुषंगाने याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

राज्यातील विशेष शाळा/कर्मशाळा बाबत असलेली विषमता दूर करण्यासाठी व दिव्यांग बालकांची शैक्षणिक गैरसोय टाळण्याकरीता राज्याचे हस्तांतरण-स्थलांतरण धोरणातील तरतूदीस अनूसरुन राज्यस्तरीय समितीने दि. २५.०२.२०१९ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारशीनूसार बंद पडलेल्या अनुदानीत विशेष शाळा/कर्मशाळेचे खालीलप्रमाणे स्वयंसेवी संस्थेस खालील अटींच्या अधीन राहून हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	बंद असलेली विशेष शाळा/ कर्मशाळा	राज्यस्तरीय समितीने हस्तांतरण/स्थलांतरण करण्यास निवड केलेली संस्था	विशेष शाळा / कर्मशाळा चालविण्या साठीचा प्रवर्ग व मान्य संख्या	स्थलांतरणाचे ठिकाण
१	कै.भास्करराव शिंगणे अस्थिव्यंग विद्यालय, लोणार ता.लोणार, जि.बुलढाणा	आईदेवमोगरा महिला मंडळ, धुळे, ता.जि.धुळे	मतिमंद	शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे

<u>**अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत**</u> :-

१. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी सदरहू संस्थेची शाळा सुरु झाल्यानंतर तपासणी करुन संबंधीत संस्था दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनूसार अनुज्ञाप्ती देण्यास पात्र असल्याची खात्री करुन अनुज्ञाप्ती द्यावी.
२. शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अटी व शर्तीची सदरहू संस्थेस पूर्तता करणे बंधनकारक राहील.
३. वरीलप्रमाणे शासनाच्या आदेशाचे आणि अटी व शर्तींचे पालन न केल्यास संबंधीत संस्थेस स्थलांतर करण्यास दिलेली शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल.
४. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे तथा सक्षम प्राधिकारी यांनी दिव्यंग हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनूसार तसेच अपंग शाळा २०१८ च्या संहितेनूसार आणि शासनाने वेळोवेळी काढलेल्या

स्थायी आदेशानूसार व मा.न्यायालयाचे काही आदेश/निर्णय असल्यास ते लक्षात घेऊन संस्थेस हस्तांतर व स्थलांतर करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

५. या प्रकरणी हस्तांतर व स्थलांतर करण्यास काही अडचणी उद्भवल्यास आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी वस्तूस्थितीदर्शक अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

६. मुळ संस्थेने नियुक्त केलेली शाळेतील प्रशासकीय मान्यताप्राप्त कर्मचाऱ्यांना नवीन संस्थेत प्राथम्याने सामावून घेण्यात यावे.

७. बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळेस जेवढी मान्य विद्यार्थी संख्या होती व जेवढे वर्ग होते तेवढे वर्ग सुरु करण्यात यावे. हस्तांतरीत झाल्यानंतर मान्य संख्येप्रमाणे प्रवेश परिपूर्ण करुन एकाच वेळी सर्व वर्ग/व्यवसाय प्रशिक्षण वर्ग सुरु करणे आवश्यक राहील. हस्तांतरणाच्या वेळी कोणत्याही नवीन पदास अथवा विद्यार्थी संख्येस वाढ दिली जाणार नाही. संस्थेने विना परवानगी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या अवैध समजण्यात येतील.

८. हस्तांतरीत झालेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळामध्ये जुन्या बंद पडलेल्या शाळेतील/कर्मशाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना समायोजनाने नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर एकवीस दिवसांच्या आत कर्तव्यावर रूजू होणे बंधनकारक राहील. जे शिक्षक/कर्मचारी रुजू न झाल्यास त्यांना सेवेची आवश्यकता नाही असे समजून त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच त्यांचे नाव प्रतिक्षा यादीतून कायमचे काढून टाकण्यात येईल.

९. अनुदानित बंद पडलेली अथवा मान्यता रद्द केलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा हस्तांतरीत झाल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून अशा अपंगांच्या अनुदानित शाळा/कर्मशाळांना निधीच्या उपलब्धतेप्रमाणे नियमानूसार वेतन व वेतनेतर अनुदान देण्यात येईल.

१०. शासनाने हस्तांतरणाचे आदेश पारित केल्यानंतर संस्थेने नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन तीन महिन्याचे आत अपंगांची विशेष शाळा/कर्मशाळा सुरु न केल्यास हस्तांतरणाचे आदेश रद्द करण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्याकडून उचित कार्यवाही करण्यात येईल. याबाबतील संस्थेची कोणतीही सबब ऐकून घेतली जाणार नाही.

११. राज्यात अपंगांसाठी विशेष शाळेऐजी Early Intervention Program राबविण्याची आवश्यकता असल्याने व सद्य:स्थितीत राज्यामध्ये अपंगांसाठी Early Intervention Program राबविणाऱ्या संस्थांची संख्या नगण्य असल्याने सध्या ज्या संस्था अपंगांसाठी विशेष शाळा चालवित आहेत अशा अनुदानित शाळांना Early Intervention Program व मतिमंद आणि कर्णबधीरांसाठी पाच वर्षांच्या खालील विद्यार्थ्यांकरीता डे केअर सेंटर, पालक मार्गदर्शन सल्ला केंद्रासह राबविणेबाबत त्यांना निर्देश देण्यात येत आहेत. तेव्हा हस्तांतरीत केलेल्या शाळांना शाळा चालविणेबरोबरच पाच वर्षांच्या खालील विद्यार्थ्यांकरीता डे केअर सेंटर, पालक मार्गदर्शन व सल्ला केंद्रासह सुरु करणे बंधनकारक राहिल. त्यासाठी कोणताही जादाचा निधी व कर्मचारी वर्ग दिला जाणार नाही.

१२. हस्तांतरण झालेल्या मतिमंदांच्या शाळेमध्ये ३० पेक्षा कमी बुध्यांक असणाऱ्या अतितीव्र मतिमंद विद्यार्थ्यांना प्रवेश प्राधान्याने देण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६१७१५३५१५९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2019.06.18 17:58:03 +05'30'

(ज्ञा.ल.सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री (सामाजिक न्याय),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) सचिव (सामाजिक न्याय), यांचे स्वीय सहायक, मुंबई ४०० ००१.
३) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा/वाशिम
६) समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा/वाशिम
७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
८) जिल्हा कोषाधिकारी, बुलढाणा/वाशिम
९) अध्यक्ष / सचिव, आईदेवमोगरा महिला मंडळ, धुळे, ता.जि.धुळे
१०) निवडनस्ती (अपंग कल्याण -१).

*****